# ग.गो.जाधव अध्यासनाच्या पुस्तकांच्या प्रकाशनामुळे आश्वासनपूर्तीचा आनंद : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

**कोल्हापूर ● प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री (कै.) डॉ. ग.गो.जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन करीत असताना महत्त्वपूर्ण आश्वासनपूर्ती केल्याचा आनंद होतो आहे, असे उद्गार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे काढले. विद्यापीठाच्या पद्मश्री (कै.) डॉ.ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने डॉ. शिवाजी जाधव लिखित 'पद्मश्री डॉ. ग.गो. जाधव यांची पत्रकारिता' आणि डॉ. आलोक जत्राटकर संपादित ''पुढारी'कार पद्मश्री (कै.) डॉ. ग.गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला संग्रह (सन १९८८-२०१९)' या दोन पुस्तकांची निर्मिती करण्यात आली आहे. या पुस्तकांचे आणि विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षाच्या वतीने निर्मित 'शिव-वार्ता: माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ (सन २०१९-२०२०)' या वार्तांकलन पुस्तिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आज कुलगुरू कार्यालयात करण्यात आले. त्यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते.



पुस्तक प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे, प्र.कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, कुलसचिव डॉ.नांदवडेकर आदी.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, डॉ. शिवाजी जाधव यांनी पद्मश्री. डॉ.ग.गो. जाधव यांच्या पत्रकारितेविषयी पीएच.डी.संशोधन केले. या संशोधनावर आधारित ग्रंथातून डॉ.ग.गो. जाधव यांच्या पत्रकारितेचे अनेक पैलू समोर येतात. त्यांनी त्या काळात हाताळलेले विविध मुद्दे, स्वातंत्र्य चळवळ, विकासाचे प्रश्न, शेती, शेतकरी, कष्टकरी, महिला तसेच उपेक्षित घटकांच्या संदर्भात केलेली पत्रकारिता आणि विविध चळवळींच्या संदर्भात त्यांची भूमिका, असे अनेक विषय या ग्रंथाच्या माध्यमातून वाचकांसमोर येत आहे. पत्रकारितेशी निगडित सर्व घटकांबरोबरच अभ्यासक, संशोधक व प्राध्यापक यांच्यासाठीही हे पुस्तक महत्त्वाचे ठरणार आहे.

'पुढारी'कार पद्मश्री (कै.) डॉ.ग.गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला संग्रहाविषयी बोलताना कुलगुरू डॉ. शिंदे पुढे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून रुजू झाल्यानंतर डॉ. जाधव स्मृती व्याख्यानमाला कार्यक्रमात, या मालेअंतर्गत झालेल्या व्याख्यानांचा संपादित ग्रंथ प्रकाशित करण्याची घोषणा केली होती. विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आणि डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासन यांनी त्या आश्वासनपूर्तीसाठी परिश्रम घेऊन हा व्याख्यानमाला संग्रह निर्माण केला आणि आश्वासनपूर्तीचा आनंद मला मिळवून दिला, याचा अभिमान वाटतो. त्यासाठी डॉ.जत्राटकर यांच्यासह अध्यासनाचे माजी चेअर प्राध्यापक डॉ. रत्नाकर पंडित आणि समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

**'शिव-वार्ता' चे द्वितीय प्रकाशन**

कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते यावेळी जनसंपर्क कक्षाचा उपक्रम असलेल्या 'शिव-वार्ता: माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ (सन २०१९-२०२०)' या पुस्तिकेचेही प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते म्हणाले, विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षातर्फे विविध प्रसारमाध्यमांतून प्रसिद्ध झालेल्या विद्यापीठविषयक वार्ता संकलित स्वरूपात 'शिव-वार्ता'मध्ये दरवर्षी प्रकाशित करण्यात येतात. या वर्षी सुद्धा त्याचे प्रकाशन होते आहे, ही आनंदाची बाब आहे. सर्व माध्यमांतून प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमीला वाव जागेअभावी स्थान देता येत नसले तरी त्या त्या कालखंडात विद्यापीठात झालेल्या घडामोडी आणि त्याचे माध्यमांतील प्रतिबिंब यांची माहिती होण्याच्या दृष्टीने 'शिव-वार्ता'हा उपक्रम महत्त्वाचा आहे. त्याचे प्रकाशन करताना मोठे समाधान वाटते आहे.

याप्रसंगी विद्यापीठाच्या पद्मश्री (कै.) डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, माजी चेअर प्राध्यापक डॉ. रत्नाकर पंडित, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

दैनिक जनप्रवास

संपादक - संजय प्रल्हाद घोडे ... E-Mail Address : janpravas1@gmail.com, janpravas1@rediffmail.com

# कुलगुरूंची ११६ महाविद्यालयांना भेट

## विद्यार्थ्यांशी संवाद; सर्वाधिक भेटी देणारे ठरले पहिलेच डॉ. देवानंद शिंदे

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी आपल्या कारकिर्दीत तब्बल ११६ महाविद्यालयांना भेटी दिल्या. शिवाजी विद्यापीठाशी २९७ महाविद्यालये संलग्नित आहेत. त्यापैकी ११६ म्हणजे एक तृतीयांशाहून अधिक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. विद्यापीठाच्या इतिहासात एवढ्या मोठ्या प्रमाणात भेटी देणारे डॉ. शिंदे हे पहिलेच कुलगुरू आहेत. डॉ. शिंदे यांचा कुलगुरू पदाचा कार्यकाळ १८ जून रोजी संपणार आहे.



> कुलगुरू आणि संलग्नित महाविद्यालये अगर संबंधित घटक यांच्यात अप्रत्यक्ष दरी असते. ती संवादाच्या माध्यमातून दूर व्हावी आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे यासाठी अचानक भेट द्यायचो. संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या विविध संशोधन प्रोत्साहन योजना असोत अगर विद्यार्थिनींसाठी बस पास योजना आणि स्वच्छतागृह योजना असोत; या सर्व विद्यार्थ्यांशी झालेल्या चर्चेतूनच साकार झालेल्या बाबी आहेत.
>
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

कुलगुरू डॉ. शिंदे शिवाजी विद्यापीठात रुजू झाल्यानंतर विविध महाविद्यालयांसह इतर संस्थांकडूनही त्यांना विविध कार्यक्रमांसाठी निमंत्रित केले जात असे. संबंधित कार्यक्रमांसाठी जात असताना त्या मार्गावर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये असत. मात्र, आधी त्यांची नेमकी माहिती नसे. त्यामुळे जाताना किंवा येताना क्वचित एखाद्या महाविद्यालयास कुलगुरू अचानकपणे, पूर्वसूचना न देता भेट देत असत. प्राचार्य, प्राध्यापक यांना पूर्वसूचना न देता महाविद्यालयात जाणे, कँटीनमध्ये विद्यार्थ्यांसमवेत गप्पा मारत चहापान करणे, एखाद्या वर्गात अचानकपणे जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, त्यानंतर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपासून अन्य स्टाफशी संवाद साधणे आणि सर्वात शेवटी प्राचार्यांची भेट घेणे अशी सर्वसाधारण कुलगुरूंच्या भेटीचे स्वरूप असे. कोणताही औपचारिक सत्कार वगैरे न स्वीकारता थेट विद्यार्थ्यांशी सहज संवाद साधणारे कुलगुरू म्हणून डॉ. शिंदे यांची ओळख विद्यापीठ राहील. त्यांनी पाच वर्षांच्या कालावधीत जिल्ह्यातील ३२, सांगली जिल्ह्यातील ३८ आणि सातारा जिल्ह्यातील ४६ अशा एकूण ११६ संलग्नित महाविद्यालयांना भेटी दिल्या. कार्यक्रमांच्या निमित्ताने विद्यापीठ परिक्षेत्राबाहेरील अनेक महाविद्यालयांनाही कुलगुरूंनी भेटी दिलेल्या आहेत.

### महाविद्यालयांची उभारणी

गतवर्षी महापूर ओसरल्यानंतर कुलगुरूंनी पूरबाधित महाविद्यालयांच्या पाहणीसाठी सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांचा केलेला दौरा केला. महाविद्यालयांचा, ग्रंथालयांच्या नुकसानिचा आढावा घेऊन कुलगुरूंनी या महाविद्यालयांना सर्वोतोपरी मदत केली.

# ग.गो.जाधव अध्यासनाच्या पुस्तकांच्या प्रकाशनामुळे आश्वासनपूर्तीचा आनंद : कुलगुरू



**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री (कै.) डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन करीत असताना महत्त्वपूर्ण आश्वासनपूर्ती केल्याचा आनंद होतो आहे, असे उद्गार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे काढले.

विद्यापीठाच्या पद्मश्री (कै.) डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने डॉ. शिवाजी जाधव लिखित पद्मश्री डॉ. ग.गो. जाधव यांची पत्रकारिता आणि डॉ. आलोक जत्राटकर संपादित पुढारीकार पद्मश्री (कै.) डॉ. ग.गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला संग्रह (सन १९८८-२०१९) या दोन पुस्तकांची निर्मिती करण्यात आली आहे. या पुस्तकांचे आणि विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षाच्या वतीने निर्मित शिव-वार्ता: माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ (सन २०१९-२०२०) या वार्तासंकलन पुस्तिकेचे प्रकाशन कुलगुरु डॉ. शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आज कुलगुरु कार्यालयात करण्यात आले. त्यावेळी कुलगुरु डॉ. शिंदे बोलत होते.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, डॉ. शिवाजी जाधव यांनी पद्मश्री. डॉ. ग.गो. जाधव यांच्या पत्रकारितेविषयी पीएच. डी. संशोधन केले. या संशोधनावर आधारित ग्रंथातून डॉ. ग.गो. जाधव यांच्या पत्रकारितेचे अनेक पैलू समोर येतात. त्यांनी त्या काळात हाताळलेले विविध मुद्दे, स्थानिक विकासाचे प्रश्न, शेती, शेतकरी, कष्टकरी, महिला तसेच उपेक्षित घटकांच्या संदर्भात केलेली पत्रकारिता आणि विविध चळवळींच्या संदर्भात त्यांची भूमिका, असे अनेक विषय या ग्रंथाच्या माध्यमातून वाचकांसमोर येत आहे. पत्रकारितेशी निगडित सर्व घटकांबरोबरच अभ्यासक, संशोधक व प्राध्यापक यांच्यासाठीही हे पुस्तक महत्त्वाचे ठरणार आहे.

पुढारीकार पद्मश्री (कै.) डॉ. ग.गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला संग्रहाविषयी बोलताना कुलगुरु डॉ. शिंदे पुढे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा कुलगुरु म्हणून रुजू झाल्यानंतर डॉ. जाधव स्मृती व्याख्यानमाला कार्यक्रमात, या मालेअंतर्गत झालेल्या व्याख्यानांचा संपादित ग्रंथ प्रकाशित करण्याची घोषणा केली होती. विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आणि डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासन यांनी त्या आश्वासनपूर्तीसाठी परिश्रम घेऊन हा व्याख्यानमाला संग्रह निर्माण केला आणि आश्वासनपूर्तीचा आनंद मला मिळवून दिला, याचा अभिमान वाटतो. त्यासाठी डॉ. जत्राटकर यांच्यासह अध्यासनाचे माजी चेअर प्राध्यापक डॉ. रत्नाकर पंडित आणि समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.


'शिव-वार्ता'चेही प्रकाशन

कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते यावेळी जनसंपर्क कक्षाचा उपक्रम असलेल्या शिव-वार्ता: माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ (सन २०१९-२०२०) या पुस्तिकेचेही प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते म्हणाले, विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षातर्फे विविध प्रसारमाध्यमांतून प्रसिद्ध झालेल्या विद्यापीठविषयक वार्ता संकलित स्वरुपात शिव-वार्तामध्ये दरवर्षी प्रकाशित करण्यात येतात. या वर्षी सुद्धा त्याचे प्रकाशन होते आहे, ही आनंदाची बाब आहे. सर्व माध्यमांतून प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमीला यात जागेअभावी स्थान देता येत नसले तरी त्या त्या कालखंडात विद्यापीठात झालेल्या घडामोडी आणि त्यांचे माध्यमांतील प्रतिबिंब यांची माहिती होण्याच्या दृष्टीने शिव-वार्ता हा उपक्रम महत्त्वाचा आहे. त्याचे प्रकाशन करतानाही मोठे समाधान वाटते आहे.

या प्रसंगी विद्यापीठाच्या पद्मश्री (कै.) डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, माजी चेअर प्राध्यापक डॉ. रत्नाकर पंडित, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

# सर्वाधिक संलग्नित महाविद्यालयांना भेट देणारे कुलगुरू

# डॉ. देवानंद शिंदे यांच्या पाच वर्षांत ११६ महाविद्यालयांना भेटी



**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्वाधिक संलग्नित महाविद्यालयांना भेटी देणारे कुलगुरू ठरले आहेत. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील सुमारे ११६ महाविद्यालयांना नियोजित कार्यक्रमांसह सदिच्छा भेटी किंवा सरप्राईज व्हिजिट दिल्या आहेत.

शिवाजी विद्यापीठाशी २९७ महाविद्यालये संलग्नित आहेत. त्यापैकी ११६ म्हणजे एक तृतिअंशाहून अधिक महाविद्यालयांना कुलगुरूंनी आपल्या पाच वर्षांच्या कारकीर्दीत भेटी दिल्या. यातील अनेक महाविद्यालयांना भेट देणारे ते पहिलेच कुलगुरू ठरले.

कुलगुरू डॉ. शिंदे शिवाजी विद्यापीठात रुजू झाल्यानंतर विविध महाविद्यालयांसह इतर संस्थांकडूनही त्यांना विविध कार्यक्रमांसाठी निमंत्रित केले जात असे. संबंधित कार्यक्रमांसाठी जात असताना त्या मार्गावर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये असत. मात्र, आधी त्यांची नेमकी माहिती नसे. त्यामुळे जाताना किंवा येताना क्वचित एखाद्या महाविद्यालयास कुलगुरू अचानकपणे, कोणतीही पूर्वसूचना न देता भेट देत असत. पुढे संगणकशास्त्र अधिविभागाचे प्रा. आर.के. कामत आणि भूगोल अधिविभागाचे डॉ. सचिन पन्हाळकर यांच्याशी चर्चा करून कुलगुरूंनी एक विशेष मॅप ॲप्लिकेशन तयार करून घेतले, ज्याद्वारे त्यांच्या प्रवासाच्या मार्गावर असणारी संलग्नित महाविद्यालये आणि त्यांच्यापर्यंत जाण्याचा मार्ग ही सारी माहिती दिसत असे. त्यामुळे कुलगुरूंना अधिक सुनियोजितरित्या महाविद्यालयांना भेटी देता आल्या. संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक यांना कोणतीही पूर्वसूचना न देता महाविद्यालयात जाणे, महाविद्यालयाच्या कँटीनमध्ये जाऊन तेथील विद्यार्थ्यांसमवेत गप्पा मारत चहापान करणे, एखाद्या वर्गात अचानकपणे जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, त्यानंतर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपासून अन्य स्टाफशी संवाद साधणे आणि सर्वात शेवटी प्राचार्यांची भेट घेणे अशी सर्वसाधारण कुलगुरूंची सरप्राईज व्हिजिट असे. कोणताही औपचारिक सत्कार वगैरे न स्वीकारता थेट विद्यार्थ्यांशी सहज संवाद साधणारे कुलगुरू म्हणून डॉ. देवानंद शिंदे यांची ओळख विद्यापीठ परिक्षेत्रात राहील. त्यांनी आपल्या पाच वर्षांच्या कालावधीत कोल्हापूर जिल्ह्यातील ३२, सांगली जिल्ह्यातील ३८ आणि सातारा जिल्ह्यातील ४६ अशा एकूण ११६ संलग्नित महाविद्यालयांना भेटी दिल्या. विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने विद्यापीठ परिक्षेत्राबाहेरील अनेक महाविद्यालयांनाही कुलगुरूंनी भेटी दिलेल्या आहेत.

**मुंबई विद्यापीठाच्या कारकीर्दीत...**

मध्यंतरीच्या काळात मुंबई विद्यापीठाचा प्रभारी कार्यभारही कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याकडे होता. मुंबईतल्या चर्चगेटपासून ते सिंधुदुर्गातल्या बांद्यापर्यंत ७६२ संलग्नित महाविद्यालये असा मुंबई विद्यापीठाचा विस्तार. कुलगुरूंनी ठरविले तरी, या संलग्नित महाविद्यालयांना भेटी देणे शक्य होत नाही. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी मात्र उत्तरपत्रिकांच्या ऑनस्क्रीन मूल्यांकन सुविधेची पाहणी करण्याकरिता आणि निकाल गतीने लावण्यासाठी प्राध्यापकांना प्रेरित करण्याकरिता कोकणातल्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये दोन दिवसांचा झंझावाती दौरा करून ११ महाविद्यालयांना भेटी दिल्या. महाड, दापोली, चिपळूण, खेड, तळेरे, वैभववाडी, फणसगाव इत्यादी ठिकाणच्या महाविद्यालयांना त्यांनी सरप्राईज भेटी दिल्या. यातील काही महाविद्यालयांना भेट देणारे मुंबई विद्यापीठाचे ते पहिलेच कुलगुरु ठरले. याखेरीज मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रातील पन्नासेक महाविद्यालयांना त्यांनी वेळोवेळी भेटी दिल्या, त्या वेगळ्याच!

**महापूर काळात...**

गतवर्षी महापूर ओसरल्यानंतर कुलगुरूंनी पूरबाधित महाविद्यालयांच्या पाहणीसाठी सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांचा केलेला दौरा हा अत्यंत हृद्य ठरला. महाविद्यालयांची, विशेषतः तेथील ग्रंथालयांतील पुस्तके, प्रयोगशाळा आणि फर्निचर पुराने झालेली दुरवस्था पाहून त्यांचा कंठ दाटून आला. त्यांच्यामधील भावनाप्रधान माणसाचे दर्शन यावेळी सर्वांनाच झाले. प्राचार्यांसह सर्व संबंधित घटकांच्या खांद्यावर हात ठेवून ते दिलासा देत. संबंधित जिल्हा प्रशासनांकडे त्यांनी शासन स्तरावरून बाधित महाविद्यालयांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी विनंती केली. त्यापुढे जाऊन विद्यापीठ स्तरावरून पूरबाधित महाविद्यालयांना दुरुस्ती, पुस्तक खरेदी इत्यादी बाबींसाठी आर्थिक मदत जाहीर केली. सर्व जिल्ह्यांतील एनसीसी व एनएसएस युनिटच्या माध्यमातून त्या त्या ठिकाणी स्वच्छता मोहिमा राबविल्या. स्वतःसुद्धा स्वच्छतेच्या कामी सक्रिय सहभाग घेतला.

या सर्व माध्यमांतून विद्यार्थ्यांत, माणसांत मिसळून जाणारा, एकरुप होणारा माणूस अशी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची ओळख निश्चितपणे राहील.

**पदामुळे निर्माण होणारी दरी सांधण्यासाठीच भेटी**

संलग्नित महाविद्यालयांना सरप्राईज (अचानक) भेटी देऊन तेथील विद्यार्थी-विद्यार्थिनींशी थेट संवाद साधण्यामागील भूमिका स्पष्ट करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले की, पदाच्या दबावामुळे कुलगुरू आणि संलग्नित महाविद्यालये अगर सर्व संबंधित घटक यांच्यामध्ये एक प्रकारची अप्रत्यक्ष दरी निर्माण होते. ती दरी संवादाच्या माध्यमातून सांधली जावी, जास्तीत जास्त घटकांपर्यंत, विशेषतः विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे आणि त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या अपेक्षा जाणून घ्याव्यात, अशी या सरप्राईज व्हिजिटमागे माझी भूमिका असे. विद्यापीठामार्फत संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या विविध संशोधन प्रोत्साहन योजना असोत अगर विद्यार्थिनींसाठी बस पास योजना आणि स्वच्छतागृह योजना असोत; या सर्व विद्यार्थ्यांशी चर्चेतूनच साकार झालेल्या बाबी आहेत. माझ्या भेटींमधून प्राप्त झालेले हे फलित आहे, अशी माझी भावना आहे.

# सर्वाधिक संलग्नित महाविद्यालयांना भेट देणारे कुलगुरू



## डॉ. देवानंद शिंदे यांच्या पाच वर्षांत ११६ महाविद्यालयांना भेटी

**कोल्हापूर • प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्वाधिक संलग्नित महाविद्यालयांना भेटी देणारे कुलगुरू ठरले आहेत. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील सुमारे ११६ महाविद्यालयांना नियोजित कार्यक्रमांसह सदिच्छा भेटी किंवा सरप्राईज व्हिजिट दिल्या आहेत.

शिवाजी विद्यापीठाशी २९७ महाविद्यालये संलग्नित आहेत. त्यापैकी ११६ म्हणजे एक तृतिअंशांहून अधिक महाविद्यालयांना कुलगुरूंनी आपल्या पाच वर्षांच्या कारकीर्दीत भेटी दिल्या. यातील अनेक महाविद्यालयांना भेट देणारे ते पहिलेच कुलगुरू ठरले.

कुलगुरू डॉ. शिंदे शिवाजी विद्यापीठात रुजू झाल्यानंतर विविध महाविद्यालयांसह इतर संस्थांकडूनही त्यांना विविध कार्यक्रमांसाठी निमंत्रित केले जात असे. संबंधित कार्यक्रमांसाठी जात असताना त्या मार्गावर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये असतात. मात्र, आधी त्यांची नेमकी माहिती नव्हती. त्यामुळे जाताना किंवा येताना क्वचित एखाद्या महाविद्यालयास कुलगुरू अचानकपणे, कोणतीही पूर्वसूचना न देता भेट देत असत. पुढे संगणकशास्त्र अधिविभागाचे प्रा. आर.के. कामत आणि भूगोल अधिविभागाचे डॉ. सचिन पन्हाळकर यांच्याशी चर्चा करून कुलगुरूंनी एक विशेष मॅप ॲप्लीकेशन तयार करून घेतले, ज्याद्वारे त्यांच्या प्रवासाच्या मार्गावर असणारी संलग्नित महाविद्यालये आणि त्यांच्यापर्यंत जाण्याचा मार्ग ही सर्व माहिती दिसत असे. त्यामुळे कुलगुरूंना अधिक सुनियोजितरित्या महाविद्यालयांना भेटी देता आल्या. संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक यांना कोणतीही पूर्वसूचना न देता महाविद्यालयात जाणे, महाविद्यालयाच्या कँटीनमध्ये जाऊन तेथील विद्यार्थ्यांसमवेत गप्पा मारत चहापान करणे, एखाद्या वर्गात अचानकपणे जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, त्यानंतर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपासून अन्य स्टाफशी संवाद साधणे आणि सर्वात शेवटी प्राचार्यांची भेट घेणे अशी सर्वसाधारण कुलगुरूंची सरप्राईज व्हिजिट असे. कोणताही औपचारिक सत्कार वगैरे न स्वीकारता थेट विद्यार्थ्यांशी सहज संवाद साधणारे कुलगुरू म्हणून डॉ. देवानंद शिंदे यांची ओळख विद्यापीठ परिक्षेत्रात राहील. त्यांनी आपल्या पाच वर्षांच्या कालावधीत कोल्हापूर जिल्ह्यातील ३२, सांगली जिल्ह्यातील ३८ आणि सातारा जिल्ह्यातील ४६ अशा एकूण ११६ संलग्नित महाविद्यालयांना भेटी दिल्या. विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने विद्यापीठ परिक्षेत्राबाहेरील अनेक महाविद्यालयांनाही कुलगुरूंनी भेटी दिलेल्या आहेत.